# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०८/२०२५ ( रविवार )

---

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू पिणाऱ्या/बाळगणाऱ्या/विक्री/वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ०८ गुन्हे नोंद एकुण ८६,९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०९/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहतुकीसाठी वापरलेले वाहन असा एकुण ८६,९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपी** रामनाथ विश्वनाथ लोंढे वय. ३४ रा वाघधर वाडी विष्णूलक्षीनगर कन्हान, ता—पारशिवनी यांच्यावर **देशी दारू वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद आहे. तसेच** नितेश धनराज सहारे, वय. २९ वर्ष, रा. शिवाजीनगर पिपरी कन्हान ता. पारशिवनी याचेवर गून्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपी** अर्जून संभा शेरकूरे, वय. ४८ वर्ष, रा. उमरी, ता. रामटेक याचेवर मोहाफूल हातभट्टी गावठी दारू काढतांनी कारवाही करून गून्हा नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी** कुनाल विष्णूजी वाघ, वय २९ वर्षे रा. वार्ड नं. २ तेलकामठी ता. कळमेश्वर यांचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी** मायगो मधूकर वरखडे, वय ३५ वर्ष रा. गोथूळना, ता—सावनेर, जि नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नितीन दिलीप मेश्राम, वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ०५ पाचगाव, ता. उमरेड याचेवर गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी राजेश पवार, वय. ४० वर्ष, रा. मौदी, ता. रामटेक **याचेवर गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी आरोपी** प्रजूत अरून मानकर, वय. ४० वर्ष, व्हिडीओ चौक वार्ड क्र. ६ बूटीबोरी, याचे वर गुन्हा नोंद आहे.

अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे दाखल केले आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या २ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** :— काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी गजानन सूधाकर अंबूडारे, वय. २७ वर्ष, रा. मेंढकी, ता. काटोल, जि. नागपूर हा तारबाजार काटोल येथे सार्वजनिक ठीकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** कळमेश्वर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी प्रशांत ज्ञानेश्वर दूबे, वय. ३७ वर्ष, रा. गिरहे लेआउट कळमेश्वर, जि. नागपूर हा दादाजी धूनेवाले दरगासमोर कळमेश्वर येथे सार्वजनिक ठीकाणी अंमली पदार्थ सिगारेट मध्ये भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण २ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## सट्टापट्टी चालविणाऱ्या तसेच अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०५ गुन्हे नोंद. करून २,७६,४५०/—रू चा मूद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०९/०८/२०२५ रोजी महाराष्ट्र जूगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी सट्टापटी चालविणाऱ्या व ५२ ताशपत्त्यावर जूगार खेळणाऱ्यांवर कारवाही करून एकुण २,७६,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून ०५ गून्हे नोंद**

**पोलीस स्टेशन कुही**:— दिनांक १०/०८/२०२५ रोजी उपविभाग उमरेड विभागात पोलीस रात्रगस्त करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की **पाचगाव सोयाबिन कंपणीचे पाठीमागील लेआउट चे खाली जागेत** काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१.धिरज प्रकाश दगडे, वय ३२ वर्षे, २. प्रविन विजयरावजी बोरकर वय ४३ वर्षे, ३. रमेश सुरेश चंदनखेडे, वय ३४ वर्षे,** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम २,२४०/—** रूपये १. होन्डा शाईन क्रं MH-40-SR-

5932 किंमत ३५,०००/— २. हिरो स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-40-DB 6062 कि. ६०,०००/—रू ३. हिरो स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-40 BU-7507 कि. ५०,०००/—रू ४. हिरो स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-40-CV 0384 कि. ६०,०००/—रू असा एकूण २,०७,२४०/—रू चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे. तसेच **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत दि. ०९/०८/२०२५ रोजी मौजा वडद येथे** आरोपी क्र. १. परेश मंगल बरठी, वय. ३० वर्ष, आरोपी क्र. २. हिमांशू कुंदन महाजन वय. २७ वर्ष, आरोपी क्र.३. मोहम्मद इस्लाम मोहम्मद यूसूफ रंगरैज, वय. ६६ वर्ष, आरोपी क्र. ४. सूभम गोविंदराव सूर्यवंशी, वय. ३२ वर्ष, आरोपी क्र. ५ कार्तीक प्रमोद नारनवरे, वय. २८ वर्ष हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ८९४०/—** रूपये, मोबाईल हॅडसेड कि. ३२,०००/—रू असा एकुण ४०,९६०/—रू चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे. तसेच **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत दि. ०९/०८/२०२५ रोजी मौजा कुही फाटा येथे** आरोपी क्र. १. चंद्रशेखर हरीभाऊ ढगे, वय. ५१ वर्ष, आरोपी क्र. २. किशोर तावडे हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ७८५/—** रूपये चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कूही येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे

**पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत दि. ०९/०८/२०२५ रोजी मौजा बोरी येथे आठवडी बाजारातील विहाराजवळ** आरोपी क्र. १. रविंद्र गूलाबराव चिकराम, वय. ५३ वर्ष, आरोपी क्र. २. मंगेश देवरावजी रूईकर, वय. ४० वर्ष हे कागदावर आकडे लीहून सट्टापट्टी चालवितांना व लावतांना मीळून आल्याने आरोपीतांच्या **ताब्यातुन रोख रक्कम ६,८५०/—** रूपये व मोबाईल कि. २०,०००/—असा एकुण २६,८५०/—रू चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे

**पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत दि. ०९/०८/२०२५ रोजी मौजा खरसोली येथे** आरोपी अक्षय अनिल तायवाडे, वय. १९ वर्ष हे कागदावर आकडे लीहून सट्टापट्टी चालवितांना व लावतांना मीळून आल्याने आरोपीतांच्या **ताब्यातुन रोख रक्कम ६३५/—** रूपये चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०९/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १०/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री. संतोष गायकवाड, पोलीस उप अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच कन्हान विभागात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री. संतोष गायकवाड, यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच अन्नामोड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये कन्हान पोलीस स्टेशनचे अधिकारी व अमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने